# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/06/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## हुंडाबळी

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत २२ किमी अंतरावर मौजा थडीपवनी येथे दिनांक ११/०३/२०२३ चे १३.०० वा. ते दि. १७/०३/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. माधुरी सुनिलराव मारबते, वय ४५ वर्ष रा. थडीपवनी ता. नरखेड ही तिचे पती व मुलगी वैष्णवी सुनिल मारबते वय २३ वर्ष व एक मुलगा अभय वय २१ वर्ष असे मिळुन थडीपवनी येथे राहत असुन फिर्यादीच्या मुलीसोबत **आरोपी नामे–१) भारत शंकर मौजे वय २९ वर्ष** याने लग्न जोडुन व साक्षगंध केले. त्यांनतर दि. ११/०३/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वा. दरम्यान मुलगा भारत व त्यांचे वडील नामे– **२) शंकर मौजे वय ५५ वर्ष दोन्ही रा. सुरवाडी ता. तिवसा जि. अमरावती** व जावई **३) विलास मेश्राम वय ३२ वर्ष दोन्ही रा. आर्णी जि. यवतमाळ** यांनी येवुन उदयाला मुला मुलीचे साक्षगंध आहे मुलीचे कपडे मुलीसाठी अंगठी व भांडे करायचे आहे तुम्ही आम्हाला २००,०००/–रू. (दोन लाख) दया असे म्हणुन दोन लाख रु. मागीतले तेव्हा १५०,००० (एक लाख पन्नास हजार रु दिले त्यानंतर पुन्हा ५०,०००/–रू. मागुन फिर्यादीचे मुलीसोबत लग्न न करता दुसरे मुलीसोबत भारत याने लग्न केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४ हुंडाबळी अधिनियम १९६१, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/३२२ पुरुषोत्तम धोंडे पोस्टे जलालखेडा मो. नं. ८७८८३६५२१० हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा उमरेड सफरा गाडी कंपनीचे समोर दिनांक २७/०६/२०२३ चे ११/३५ वा. सुमारास फिर्यादी नामे– समारू सदराम टंडन, वय २७ वर्ष, रा. बोरसी पो. बीजरडी ता. भाटापारा जि. बलादा छतीसगड ह. मु. संत नगर डब्ल्यू सी एल कॉलनी उमरेड व **मृतक नामे– प्रभु दुकालुराम उईके, वय ५९ वर्ष, रा. संत नगर वेकांली कॉलनी उमरेड** असे मोपेड मोटरसायकल क्र. एम. एच.– ४०/सी. जे.– ०५७५ ने उमरेड नागपूर बायपास रोड वरून आम नदी कडे जात असताना पाठीमागुन येणारी टाटा सफारी गाडी क्र. ए.पी.– ३९/एल. व्ही.– ५६५७ च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सदर मोटरसायकलला धडक मारून सदर मोटरसायकल चालकाच्या मागे बसलेला प्रभु उईके हा मरण पावला असुन चालक हा समारू टंडन जखमी आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,.३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ पोस्टे उमरेड मो. क्र. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर